# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्द पत्रक

दिनांक – ०६ जून २०१६

## प्रवेशपूर्व ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया १४ जून २०१६ पासून

मुंबई - मुंबई विद्यापीठाच्या सलंग्नित महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त शिक्षणसंस्थामध्ये पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यां ना कळविण्यात येत आहे की, शैक्षणिक वर्ष २०१६ - २०१७ साठीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील प्रथम वर्ष प्रवेशासाठी प्रवेशपूर्व ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेला १४ जून २०१६ पासून सुरुवात होणार आहे. यासंबंधीचे परीपत्रक विद्यापीठाच्या www.mu.ac.in संकेतस्थळावर अपलोड करण्यात आले आहे. मुंबई विद्यापीठामध्ये अस्तित्वात असलेल्या प्रवेशपूर्व ऑनलाईन नोंदणीच्या यंत्रणेमध्ये सुधारणा करण्यासाठी निविदा मागविल्या होत्या. त्यासंबंधीची प्रशासकिय प्रक्रिया आज पूर्ण झाली असून प्रवेशपूर्व ऑनलाईन नावनोंदणीची प्रक्रिया १४ जून २०१६ पासून सुरु केली जाणार आहे.

- अर्ज विक्री ही २६ मे २०१६ ते १४ जून २०१६ पर्यंत
- प्रवेशपूर्व ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया – १४ जून २०१६ ते २१ जून २०१६ (**शनिवार,रविवार आणि सुट्टीचे दिवस न वगळता** )
- इन हाऊस एडमिशन आणि अल्पसंख्याक कोटा प्रवेश - ७ जून २०१६ ते २१ जून २०१६ ( हे प्रवेश देताना २१ जून २०१६ पूर्वी प्रवेशपूर्व ऑनलाईन नोंदणी गरजेचे आहे, ऑफलाईन प्रवेश स्विकारले जाणार नाहीत.)
- एडमिशन फॉर्मच्या अर्जाची प्रींट घेऊन महाविद्यालयात सादर करण्याची तारीख – १८ जून २०१६ ते २२ जून २०१६ ( **३.०० वाजेपर्यंत, शनिवार,रविवार आणि सुट्टीचे दिवस न वगळता** ) **(प्रवेशपूर्व नोंदणी फॉर्म आवश्यक)**
- पहिली मेरीट लिस्ट – २२ जून २०१६ ( सायंकाळी ६.०० वाजता)

- कागदपत्रे पडताळणी आणि शुल्क भरणे – २३ जून २०१६ आणि २४ जून २०१६ ( ३.०० वाजे पर्यंत (**शनिवार,रविवार आणि सुट्टीचे दिवस न वगळता** )
- द्वीतीय मेरीट लिस्ट – २४ जून २०१६ ( सायंकाळी ६.०० वा.)
- कागदपत्रे पडताळणी आणि शुल्क भरणे – २५ जून २०१६ आणि २६ जून २०१६ ( ३.०० वाजे पर्यंत (**शनिवार,रविवार आणि सुट्टीचे दिवस न वगळता** )
- तृतीय आणि शेवटची मेरीट लिस्ट - रविवार २६ जून २०१६ ( ६.०० वाजता)
- कागदपत्रे पडताळणी आणि शुल्क भरणे – २७ जून २०१६ आणि २८ जून २०१६ ( ३.०० वाजे पर्यंत (**शनिवार,रविवार आणि सुट्टीचे दिवस न वगळता** )

पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाला प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून प्रवेशपूर्व ऑनलाईन नोंदणी करणे अनिवार्य आहे. शैक्षणिक वर्ष २०१ ६-१७ पासून मुंबई विद्यापीठाने कला, वाणिज्य आणि विज्ञान (अनुदानित आणि विनाअनुदानित ) या विद्याशाखांतील विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेशपूर्व ऑनलाईन नोंदणी अनिवार्य केली आहे. या प्रवेश प्रक्रियेसंबंधीची लिंक मुंबई विद्यापीठाच्या संकेतस्थळावर १२ जून २०१६ रोजी उपलब्ध करुन देण्यात येईल.

लीलाधर बन्सोड, उपकुलसचिव (जनसंपर्क / प्रकाशने / सांख्यिकी )